**सुविचार**

परमात्मा पापी से भी प्रेम करते हैं, सभी परमात्मा के बच्चे हैं, इसलिए मुझे परमात्मा के किसी भी बच्चे से नफरत करने का क्या अधिकार है ?

(ब्रह्मकुमारीज)


विश्वसनीय बातम्यांचे एकमेव वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत








✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/मंगळवार दि. २० फेब्रुवारी २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१०१✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# शिवनेरी किल्ल्यावर आज मुख्यमंत्र्यांनी मराठा आरक्षणाबाबत केलं सूचक विधान

पुणे : लोकसभा निवडणुका जवळ आलेल्या असताना राज्य सरकारसमोर मराठा समाजाला आरक्षण देण्याचे एक मोठे आव्हान उभे ठाकले आहे. जालन्यामध्ये मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा बेमुदत उपोषण करत असून त्यांची प्रकृती खालावली आहे. त्यामुळे मराठा समाज आणखी संतापायच्या आत मराठा आरक्षण मिळवून देण्यासाठी सरकारच्या वेगाने हालचाली सुरु आहेत. त्यातच आज शिवजयंती सोहळ्यासाठी किल्ले शिवनेरीवर आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवनेरीवरून मराठा आरक्षणाबाबत महत्त्वपूर्ण आणि सूचक विधान केलं आहे.

शिवजयंती सोहळ्यानंतर उपस्थितांना संबोधित करताना एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आपण काम करतोय. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी उद्या आपण विशेष अधिवेशन बोलावलं आहे. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी किंवा इतर कुठल्याही समाजाला धक्का न लावता इतर कुणाचंही नुकसान न करता मराठा समाजाला टिकणारं कायद्याच्या चौकटीत बसणारं आरक्षण देण्यासाठी उद्या खास अधिवेशन बोलावलेलं आहे, असं एकनाथ शिंदे यांनी



सांगितलं.

सर्व समाजाला सोबत घेऊन जाणारं हे सरकार आहे. तसेच राज्याचा सर्वांगीण विकास साधणारं हे सर्वसामान्यांचं सरकार आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसींच्या कोट्यामधून आरक्षण द्यावं या मागणीसाठी मराठा (पान २ वर)

# पुढील आदेशापर्यंत शरद पवार गटाला मिळालेले नाव कायम राहणार - सुप्रीम कोर्ट

नवी दिल्ली - पुढील आदेशापर्यंत शरद पवार गटाला मिळालेले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार हे नाव कायम राहणार, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने आज (दि.१९) दिलाय. आम्हाला निवडणूक आयोगाने दिलेले तात्पुरतं नाव निवडणुकीपर्यंत कायम ठेवा, अशी मागणी शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात केली होती. त्यानंतर न्यायलयाने हा निर्णय दिला आहे. शरद पवार गटाने चिन्हासाठी आयोगाकडे अर्ज करावा, आयोगाने नियमानुसार चिन्ह द्यावे, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

शरद पवार गटाच्या वतीने अभिषेक मनू सिंघवी सर्वोच्च न्यायालयात युक्तीवाद करत आहेत. आता लगेच अधिवेशन आहे. निवडणूक आयोगाने आम्हाला तात्पुरते नाव दिले आहे. काही दिवसात अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. नंतर निवडणुकांची तयारी सुरू होईल. आम्ही नाव आणि चिन्हाशिवाय राहू शकत नाही, त्यामुळे आम्हाला दिलेलं नाव कायम ठेवा आणि चिन्ह द्या, असा युक्तीवाद मनू सिंघवी यांनी सर्वोच्च न्यायालयात केला आहे. फूट वगळून विलीनकरणाची तरतुद करण्यात आली, त्याचा उद्देश काय, मतदारांचे काय? असे सवालही सर्वोच्च न्यायालयाने केले आहेत.

न्यायालयाने काय म्हटलं?

पवार गटाच्या मागणीवर बोलताना न्यायमूर्ती विश्वनाथन म्हणाले, मुकुल रोहतगी तुम्ही लक्षात घ्या. तुमच्या ( आयोगाच्या ) आदेशात काय लिहिलंय. दोन्ही गटांनी घटना पाळली नाही. कोणीही अपात्र ठरलं नाही. आयोगाचा निष्कर्ष काय आहे की तुम्ही दोघांनी घटना पाळली नाही. फूट वगळून विलीनीकरणाची तरतूद करण्यात आली, त्याचा उद्देश काय होता, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केला होता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर निवडणूक आयोगाने पक्षाचे नाव आणि घड्याळ हे चिन्ह उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाला दिले होते. (पान २ वर)

# लातूर शिवसेना जिल्हा संपर्क कार्यालयात शिवजयंती साजरी



लातूर :- लातूर येथील जिल्हा शिवसेनेच्या वतीने जिल्हा संपर्क प्रमुख ॲड.बळवंत भाऊ जाधव यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करुन सोमवारी शिवसेना जिल्हा संपर्क कार्यालयात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हा प्रमुख बालाजी गोडसे,शहर प्रमुख अँड परवेझभाई पठाण,शिवसेना जिल्हा सल्लागार ॲड.अर्जुन जाधव,शहर प्रमुख दिनेश बोरा,तालुका प्रमुख सदाशिव गव्हाने,उपशहरप्रमुख विजयकुमार कांबळे,विष्णू साबदे,वैभव सुर्यवंशी,संदिप मामा,महिला जिल्हा प्रमुख कल्पनाताई बावगे,उपजिल्हा प्रमुख अनिता नागिमे,महिला शहर प्रमुख बबिता गायकवाड,शहर प्रमुख मिनाक्षी मुंदडा,शहर संघटक कुशाल शिंदे,महिला उपशहर प्रमुख वंदना गोरे,महिला शहर संघटन लक्ष्मी काकणे,महिला शहर संघटक शोभा सुर्यवंशी,बालिका क्षिरसागर,अँड बालाजी सूर्यवंशी,शहर उपप्रमुख राजु बागवान, अल्पसंख्यांक शहर प्रमुख ईरफान कुरेशी,कामगार सेना प्रमुख शमशोद्दीन शेख,तालुका उपप्रमुख शाम साबळे,ईसमाईल शेख, बक्षू बागवान,बाळू शेळके,लोहारे ताई,महादु शेंडगे,संगिता शेटे, मिरा लंगे,दैवशाला कांबळे,आदींसह शिवसैनिक पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू वायएसआर भाजपच्या संपर्कात

अमरावती : आंध्र प्रदेशात एकाचवेळी होणा-या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांच्या आधी, सत्ताधारी युवाजन श्रमिका रिथू काँग्रेस पार्टी (वायएसआरसीपी) आणि विरोधी तेलुगू देसम पार्टी (टीडीपी) भारतीय जनता पक्ष (भाजप) सोबत बैठक घेत आहेत. या संदर्भात अद्याप कोणतीही ठोस घोषणा करण्यात आलेली नाही.

टीडीपीचे सुप्रीमो आणि माजी मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी ८ फेब्रुवारी रोजी रात्री उशिरा भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची नवी दिल्लीत भेट घेतली. त्यानंतर दोन्ही पक्षांमधील युतीबाबतच्या अटकळ अधिक तीव्र झाल्या. दोन्ही पक्षांनी अद्याप युतीची घोषणा केलेली नाही. टीडीपी आणि भाजपमध्ये युती होण्याची शक्यता आहे. ज्याची घोषणा काही दिवसांत केली जाऊ शकते. टीडीपीने १० फेब्रुवारीपर्यंत उमेदवारांची यादी जाहीर करण्याची योजना आखली होती. परंतु, युतीच्या चर्चेमुळे त्यास विलंब झाला.

नायडू यांच्या भेटीनंतर युतीवर शिक्कामोर्तब करण्यासाठी भाजपसोबत पडद्याआड चर्चा सुरू आहे. टीडीपीच्या प्रवक्त्या थिरुनगरी ज्योशना यांच्या मते, २० फेब्रुवारीपर्यंत उमेदवारांची यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. रवी म्हणाले की, नुकतेच नायडू यांनी काही पत्रकारांना सांगितले (पान २ वर)



**प्रौढ प्रताप पुरंदर,महापराक्रमी रणधुरंदर क्षत्रियकुलावतंस् सिंहासनाधीश्वर महाराजाधिराज महाराज श्रीमंत श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज लामजना चौक येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष बसवराजजी पाटील यांनी श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तसेच रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले या भव्य अस्या कार्यक्रमास श्रीपतराव काकडे,सुग्रीव लोंढे,गोविंदराव बाजुळगे,बसवराज धाराशिवे,संगमेश्वर ठेसे,बजरंग बाजुळगे, देवेंद्र कंटेकुरे,संजय लोंढे,श्रीराम बोडके,एकनाथ शिंदे,शेषेराव मुळे,विजय बाजुळगे,दत्तात्रय आळंणे, महादेव पाटील,प्रकाश मिरगे, किरण बाबळसुरे,महेबुब कारभारी,बालाजी शिंदे,जहीर पटवारी,व्यंकट शिंदे,धनराज जाधव,अजीत सोळूंके,मल्लिकार्जुन कुमारे,शिवाजीराव पाटील,राजाभाऊ बोरफळे,जिवण चव्हाण,अमित मुळे,बाळु ढोले वाघंबर कांबळे,यांच्या सह असंख्य शिवभक्त उपस्थित होते**




## जि.प.प्राथमिक कन्या शाळेत पालक मेळावा व हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न



हडोळती दि. १९(नागसेन गायकवाड): जि.प.प्राथमिक कन्या शाळेत पालक मेळावा व हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की, हडोळती,ता. अहमदपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेत पालक मेळावा व हळदी कुंकवाचा कार्यक्रम १७ फेब्रुवारी २०२४ रोजी घेण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. शकुंतलाबाई भोगे तर प्रमुख पाहुण्या उपसरपंच सौ.इंदुताई पवार,पोलीस पाटील बाल-ाजी मिरकले तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री संभाजीराव सूर्यवंशी हे होते.

या कार्यक्रमाला सर्व विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक एम.एम. सय्यद, सहशिक्षिका श्रीमती आर. एन.आष्टेकर, श्रीमती बी.एम. जाधव, श्रीमती आर. व्ही.जोशी, श्रीमती यू.एन. पोपलगट व श्री कोनाळे एस.एस.या सर्वांनी परिश्रम घेतले.

## उच्च शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये प्रयोगशीलतेसह संशोधनात्मकवृती निर्माण झाली पाहिजे- प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील



अहमदपूर दि.१९(कारामुंगीकर) विद्यार्थ्यांनी संपादन केलेल्या पदवीच्या जबाबदारीचे भान ठेवावे विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणातून प्रयोगशीलता व संशोधनात्मक वृत्ती निर्माण झाली पाहिजे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध लेखक, समीक्षक प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्या-पीठ अभ्यास केंद्र महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पदवी वितरण समारंभात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर हे हो-ते, तर प्रमुख पाहुणे म्हणून किनगाव येथील महात्मा फुले महाविद्यालयाचे माजी प्राचार्य तथा लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक, प्रगतीशील शेतकरी डॉ. धोंडीराम वाडकर यांच्यासह महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा आयक्यूएसी समन्वयक डॉ. डी.डी. चौधरी, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रो .डॉ. अनिल मुंढे, डॉ. बब्रुवान मोरे, प्रशांत डोंगळीकर, म नॅक म समन्वयक डॉ. प्रशांत बिराद-ार, परीक्षा विभाग प्रमुख प्रो. डॉ. अभिजीत मोरे हे उपस्थित होते.

यावेळी पुढे बोल-ताना प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील म्हणाले की, यशासाठी विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम हाच एकमेव पर्याय आहे. सातत्याने वाचन, चिंतन, निरीक्षण आणि संशोधन केले पाहिजे. शिक्षणाचा देशासाठी संशोधनात्मक दृष्ट्या उपयोग झाला पाहिजे असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी बोलताना माजी प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर म्हणाले की माणूस आयुष्यभर विद्यार्थी असला पाहिजे. जो रोज नवनवीन काहीतरी शिकतो, तोच खरा माणूस. माणसाने आपल्या शिक्षणाचा सुंदर जीवन जगण्यासाठी त्याच बरोबर समाजाच्या भल्यासाठी उपयोग करावा असेही ते म्हणाले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष किसान शिक्षण प्रस-ारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर यांच्या हस्ते उपस्थित विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग चिलगर यांनी केले. महाविद्यालयातील व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अभ्यास केंद्र महात्मा फुले महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, विद्यार्थी,पालक तसेच नूतन पदवीधारक विद्या-र्थी उपस्थित होते.

## डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयात रथसप्तमीनिमित्त सूर्यनमस्काराचे आयोजन




अहमदपूर दि. १९(प्रतिनिधी): डॉ डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयात रथसप्तमीनिमित्त सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात आले हाते.

याबाबत अधिक माहिती अशी की, रथसप्तमीनिमित्त येथील डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालय व पतंजली योग समितीच्या वतीने शुक्रवारी विद्यालयात विद्यार्थ्यांचा सामूहिक सूर्यनमस्कार घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक व्यंकटेश भदाडे होते या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून पतंजलीच्या जिल्हा संवाद प्रभारी कलावती भातांब्रे तालुकाध्यक्ष पुष्पा ठाकूर ईनरव्हल क्लबच्या तालुका अध्यक्ष मालू ताई उपस्थित होत्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेच्या सहसचिव प्रभाताई भदाडे यांनी मांडले.

यावेळी सूर्यनमस्काराचे महत्त्व व त्याचे फायदे यावर योग शिक्षिका कलावती भातांब्रे यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले. त्यापुढे म्हणाल्या रथसप्तमी व सूर्यनमस्काराचे माणसाच्या जी-वनात नेयमीत व्यायाम असेल तर शरीर तंदुरुस्त राहते अशी बहुमोल माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच सूर्यनमस्काराचे प्रकार करून दाखवले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संग्राम मुसळे यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वीतीसाठी जाधव अंगद, बचाटे रजनी ,गादगे रामेश्वर ,साबदे हरीनारायण ,यलपुरवाड गोपाळ, संदीप बोडके, नारायण केरले आदींनी परिश्रम घेतले.




## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण

लातूर / प्रतिनिधी- शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी उपस्थितांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

## आजपासुन राज्य ग्रंथालय संघाचे आळंदी (देवाची) अधिवेशन

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

**उदगीर (प्रतिनिधी)** महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे ५८ वे राज्यस्तरीय वार्षिक अधिवेशन पुणे आळंदी (देवाची) आज मंगळवार दि २० व २१ फेब्रुवारी रोजी संपन्न होणार आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे ५८ वे राज्यस्तरीय वार्षिक अधिवेशन पुणे आळंदी (देवाची) मंगळवार दि २० व २१ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले असुन या अधिवेशनाचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असुन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार हे राहणार आहेत. तर प्रमुख उपस्थितीत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री दिलीप वळसे पाटील, खा. डॉ. अमोल कोल्हे, एमआयटी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा.कराड, आ. विक्रम काळे, प्रविण मसाले उद्योग समुहाचे चेअरमन राजकुमार चोरडिया, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह सुनिता राजे पवार, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ.प्रा. शिवाजीराव कदम, नवसहयाद्री ग्रुपचे डायरेक्टर सागर जी सुके, रामसेठ गावळे, सुधिर मुंगसे आदि उपस्थित राहणार असुन प्रमुख पाहुणे म्हणून आ. महेश लांडगे, आ. उल्हासद-ादा पवार, संत ज्ञानेश्वर कमिटीचे अध्यक्ष अभय टिळक, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, विलास बालवडकर, ह.भ.प. राजाभाउ चोपदार (संत ज्ञा-नेश्वर महाराज पालखी सो-हळा), माजी आ. गंगाधर पटणे, पी.बी.सी.सीचे अध्यक्ष दिगंबर दुरांडे, उपाध्यक्ष सुनिल चांदेरे, इंडियन लॅब्ररी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे, डॉ. राजेंद्र उमाप, संत ज्ञानेश्वर महार-ाज संस्थान कमिटी विश्वस्त, पुणे विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष विजय कोलते, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले, नाशिक विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. दत्ता परदे-शी, कोकण विभाग ग्रंथालय संघ मंगेश मसके, अमरावती विभाग ग्रंथालय संघचे अध्यक्ष श्यामराव वाहुरवाघ, नागपुर विभाग ग्रंथालय संघचे अध्यक्ष अनिल बोरकमवार, जोग वारकरी शिक्षण संस्थचे अध्यक्ष संदिपान शिंदे, सहाय्यक ग्रंथालय संचालक पुणे शालिनी इंगोले, जिल्हा ग्रंथालय अधिकारी पुणे श्रेया गोखले, आळंदी न.प.चे मुख्याधिकारी कैलास शिंदे, ग्रंथमित्र गुलाबराव



पाटील, ग्रंथालय संघाचे मा.अध्यक्ष रामेश्वर पवार, पुणे ग्रंथालय संघचे अध्यक्ष धोंडिबा सुतार गुरुजी, महाराष्ट्र वारकरी मंडळाचे सचिव ह.भ.प. नर-हरी महाराज चौधरी, शिवसेना अध्यक्ष राहुल चव्हाण, उमेश चव्हाण, शिवाजीराव भुजबळ, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघाचे संस्थापक केंद्रीय कार्यवाह नंदु बनसोड हे उपस्थित राहणार आहेत.

प्रारंभी भव्य ग्रंथदिंडीचे उद्घाटन डॉ. नारायण महाराज जाधव, ह.भ.प. रामभाउ महाराज राउत, ह.भ.प. मोहन महाराज पुणे हे उपस्थित राहणार आहेत.

दुसरे सत्रात ३ ते ४ दरम्यान होणार असुन राजाराम मोहन रॉय प्रतिष्ठान कोलकत्ता अर्थसहाय्यः सद्यस्थिती आणि उपाय या विषयावर परिसंवादात कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थ-ानी डॉ. राजशेख बालेकर, कार्यउपाध्यक्ष, सहभाग शाम दाईंगडे, विषयतज्ञ, गुलाबराव मगर, कार्यवाह संभाजीनगर, ग्रंथमित्र रमेश सुतार, पुणे येथील ग्रंथालय संघाचे अध्यक्ष अरुण दांगट, सहकार्यवाह राजेंद्र ठमाले हे राहणार आहेत.

दुपारी २ वाजता वाचक संख्या वाढविण्याचे काही तंत्र आणि मंत्र या विषयावरी परिसंवादात अॅड. प्रविण पाटील, प्रा. दिगंबर इंगळे,प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, नामदेव दळवी हिंगोली जिल्हा ग्रंथाल संघ उपाध्यक्ष.

बुधवार दि. २१ रोजी सकाळी ९ वाजता परिसंवादात सार्वजनिक ग्रंथालय चळवळ एक आढावा यावेळी अध्यक्षस्थानी राज्यग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाह अनिल सोनवणे हे राहणार आहेत तर सहभाग ग्रंथमित्र भिमराव पाटील, प्रभाकर घुगे,कुंडलिक मोरे, प्रभाकर कापसे, सुनिल वायाळ, राजेश शिरसाठ हे राहणार आहेत.

चौथ्या सत्रात सकाळी १० वाजता साहित्य संस्था कालानुरुप बदल कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष दत्ता परदेशी हे राहणार आहेत. तर सहभागी श्रीकांत चौगुले, स्वाती महाळंक, प्रविण महाजन इत्यादी सहभागी होणार आहेत.

सकाळी ११ वाजता खुले अधिवेशन होणार असुन अध्यक्षस्थानी पुणे विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष विजयराव कोलते, सहभाग सर्व विभागाचे कार्यवाही अनुक्रमे अॅड. प्रविण पाटील, संतोष सेसे, प्रकाश पाटील, भाउराव पत्रे, श्रीराम देशपांडे, सोपानराव पवार, जालिंदर शिवले आदी उपस्थित राहणार आहेत.

राज्य ग्रंथालय संघाच्या अधिवेशनात महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाचे पदाधिकारी, ग्रंथपाल यांनी जास्तीजास्त संख्येने उप-स्थित राहवे असे आवाहन राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गज-ाजन कोटेवार, कार्यवाह अनिल सोनवणे व पदाधिकारी यांनी केले आहे.

## चंदीगढ महापौर निवडणुकीचे समीकरण बदलले, न्यायालयाच्या सुनावणीआधीच महापौरांचा राजीनामा

चंदीगढ: चंदीगढमधील महापौर निवडणुकीत वेगळेच वळण पाहायला मिळत आहे. चंदीगढमधील महापौर निवडणुकीबाबत आरोप करत आम आदमी पक्ष आणि काँग्रेसने सुप्रीम कोर्टामध्ये धाव घेतली आहे. दोन्ही पक्षांनी भाजपवर फसवणूक करत निवडणूक जिंकल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणात सोमवारी सुनावणी होत आहे. मात्र या सुनावणीआधीच चंदीगढच्या नवनियुक्त महापौर मनोज सोनकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

सोबतच आपचे तीन नगरसेवर नेहा मुसावट, गुरचरण काला आणि पूनम देवी यांनी पक्ष बदलल्याने चंदीगड महापौर निवडणुकीत संपूर्ण समीकरण बदलले आहे. आम आदमी पक्षाचे हे तीन नगरसेवक रविवारी भाजपमध्ये सामील झाले. भाजपाचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे यांनी माजी प्रदेश अध्यक्ष अरूण सूद यांच्यासोबत त्यांचे पक्षात स्वागत केले.

आपच्या तीन नगरसेवकांनी आता भाजपमध्ये प्रवेश केल्याने भाजपच्या नगरसेवकांची संख्या १७ झाली आहे. त्यांच्याकडे एक खासदार मतही आहे. याशशिवाय नुकत्याच झालेल्या महापौर निवडणुकीत शिरोमणी अकाली दलाच्या एकमेव नगरसेवकानेही भाजपला समर्थन दिले होते. म्हणजेच आता भाजपकडे एकूण १९ मते झाली आहेत. संख्याबळाच्या दृष्टीने भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तीन नगरसेवकांनी पक्ष बदलल्याने आम आदमी पक्ष आणि काँग्रेसच्या मतांची संख्या २० वरून घटून १७ झाली आहे. यात काँग्रेसचे ७ आणि आपचे १० नगरसेवक सामील आहेत. चंदीगड नगर पालिकेत एकूण ३५ नगरसेवक आहेत. तर एका खासदाराचे मत मिळून ३६ मते टाकली डातात. यानुसार बहुमताचा आकडा १९ असतो. तर भाजपकडे आता २० मते झाली आहेत.

**पान १ वरून**

**शिवनेरी...**

नेते मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथून पुन्हा एकदा उपोषणाला सुरुवात केली आहे. तर दुसरीकडे राज्य सरकारनेही कुणबी नोंदी न आढळलेल्या मराठा समाजातील व्यक्तींना स्वतंत्रपणे मराठा आरक्षण देण्याची तयारी केल्याचं वृत्त आहे. त्या पार्श्वभूमीवर उद्या बोलावलेल्या अधिवेशनात नेमका काय निर्णय होणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

**पुढील...**

त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे चिन्ह आणि नाव अजित पवारांना देण्याविरोधात शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर आज (दि. १९) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरु आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती के. वी. विश्वनाथन यांच्याकडून अप्रत्यक्ष पाकिस्तानचा उल्लेख

सीमेपलीकडील घडणाऱ्या घडामोडींकडे जर तुमचं लक्ष असेल तर तुमच्या लक्षात येईल की तिथे जे काही घडतंय ते कोणालातरी बॅट चिन्ह हवं होतं म्हणून झालंय, असे न्यायालयाने म्हटलं आहे.

**माजी मुख्यमंत्री...**

होते की टीडीपीच्या ८० टक्के उमेदवारांच्या नावांवर शिक्कामोर्तब झाले आहे, याचा अर्थ काही विधानसभा आणि संसदीय मतदारसंघांसाठीच युती होऊ शकते. टीडीपी आणि भाजपने एकत्र निवडणुका लढवल्या आहेत- तेव्हा त्यांना फायदा झाला आहे. वायएसआरसीपीचे असंतुष्ट खासदार के. रघुराम कृष्णा राजू यांनी सांगितले होते की, टीडीपी, भाजप आणि जनसेना सत्ताधारी वायएसआरसीपीचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री वायएस जगन मोहन रेड्डी यांचा पराभव करण्यासाठी युती करतील. नायडूंचा नवी दिल्ली दौरा संपण्याच्या काही तास आधी रेड्डी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. त्यामुळे दोन्ही पक्षांमधील राजकीय युतीबाबत अटकळ उडाली होती.

## हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा अद्वितीय इतिहास अजरामर आहे



लातूर ;दि. १९( वृत्तसेवा ) -गो ब्राह्मण प्रतिपालक, हिंदवी स्वराज्य संस्थापक ,क्षत्रिय कुलभूषण, सिंहासनाधीश्वर ,राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मरण आपण फक्त त्यांच्या जयंतीदिनी करतो ;तसेच आपण छत्रपती शिवाजी महाराजांचा उपयोग फक्त राजकारणापुरता करतो. परंतु हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा अद्वितीय इतिहास अजरामर आहे.त्याच सतत स्मरण करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पूजनीय विद्यानंदजी सागर महाराज (बाबा )यांनी आपला प्रवचनातून केले.

लातूर येथील श्री श्री राधाकृष्ण सनातन सत्संग समितीच्या वतीने पंचमुखी हनुमान मंदिर परिसरात उभारण्यात आलेल्या यज्ञ शाळेत श्री श्री अष्टोत्तर शत कुंडात्मक अतिरुद्र महायागाचे तसेच भव्य कथा मंडपात श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे .कथेच्या सहाव्या दिवशी प्रवचनात पूजनीय बाबा बोलत होते. आज शिवजयंती आहे. शिवजयंतीचे औचित्य साधून कथास्थळी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित जनसागराने ङ्गछत्रपती शिवाजी महाराज कीफ, ङ्गजय जय शिवाजी जय भवानी ङ्गअसा जयघोष करून कथा मंडप डोक्यावर घेतले .

पूजनीय बाबांची एन्ट्री आगळ्या-वेगळ्या पद्धतीने कथा मंडपात झाली. ढोल ताशे, लेझीमच्या तालावर छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करीत बाबा व भारतभरातून आलेले साधुसंत कथास्थळी आले .अग्रभागी भगवे फेटेधारी साधुसंत होते .फेटेधारी मावळे लेझीम नृत्य करीत ढोल -ताशाच्या गजरात पुढे पुढे सरकत होते. मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ मातांचे वेशभूषा केलेले कलावंत घोड्यावर स्वार झाले होते त्यानंतर पूजनीय बाबा व साधुसंत होते. सर्वात शेवटी गजराज होता. व्यासपिठावर बाबा व साधुसंत आल्यानंतर गजराजाने आपल्या सोंडेने बाबांना पुष्पहार घालून नमन केले .बाबांनी छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ माता यांच्या वेशभूषेतील कलावंतांचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण केले.

सहाव्या दिवशीच्या कथा समाप्तीनंतर व्यासपीठावर पैठण येथील शिवपुरी परिवाराच्यावतीने धर्मभूषण पदवी प्राप्त परमपूजनीय विद्यानंदजी सागर बाबा यांचा भारतभरात अखंडपणे दिव्य यज्ञ कर्म करणाऱ्या विद्वान ब्रह्मवृंदांच्या हस्ते वेदमंत्रात भगवी पगडी ,वस्त्र, पुष्पहार घालून सन्मान करण्यात आला. तसेच या अष्टोत्तर शत कुंडात्मक महायागामध्ये यज्ञ कर्म करणारे वेदशास्त्रसंपन्न कमलाकर गुरुजी (पैठण ),वेदशास्त्रसंपन्न दत्तात्रेय पोहेकर (पैठण),वेदशास्त्रसंपन्न नारायण देव सुलाखे (बीड) ,वेदशास्त्रसंपन्न महादेव शास्त्री जोशी (कोल्हापूर ),वेदशास्त्रसंपन्न अनंत खरे भट ,यज्ञ आचार्य सुरेश शिवपुरी यांचा संयोजन समितीच्या वतीने बाबांच्या हस्ते पगडी, सन्मानपत्र, वस्त्र ,पुष्पहार देऊन उचित सन्मान करण्यात आला .या कथेस दररोज भारतभरातून साधुसंत येत आहेत. आज अकोला येथून आलेले स्वामी सुरत गिरी महाराज, साध्वी सोनाली गिरीजी (अकोला ),स्वामी त्र्यंबकेश्वर नंदगिरीजी महाराज, स्वामी सुंदर गिरीजी महाराज, स्वामी कुबेर गिरीजी महाराज, स्वामी प्रेमानंदजी गिरीजी महाराज तसेच विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री दिनकर गायकर आदींचा विशाल जाधव ,जगदीश तापडिया ,राजेश्वर बुके, दगडे पाटील आदींच्या हस्ते वस्त्र व पुष्पहार घालून सन्मान करण्यात आला. द्वारकादास श्याम कुमार चे मालक तुकाराम पाटील, अँड. कैलासराव देशपांडे विक्रमसिंग चौहान यांनी आज भागवत कथा ग्रंथाचे पूजन केले .

बाबांनी आपल्या कथेचे पुष्प छत्रपती शिवाजी महाराजांना अर्पित केले .शिवाजी महाराजांच्या चरित्रावर बोलताना ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी सनातन धर्माच्या रक्षणासाठी, हिंदू हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी स्वतःला वाहून घेतले होते .धर्म रक्षण व प्रसार करत असताना महाराजांनी दुसऱ्या धर्माची अवहेलना कधीही केलेले नाही. त्यांनी अनेक परंपरांना छेद दिला .अठरापगड जातीला, मावळ्यांना सोबत घेऊन या देशावरील आक्रमण परतवून लावले .अशा या धर्माचे पालन करणाऱ्या क्षत्रिय कुलावंस छत्रपती शिवाजी महाराजांचे सतत स्मरण भावी पिढीला करून देणे गरजेचे आहे.

आजच्या बाबांच्या कथेला सांगीतिक साथ डॉ. बाबूराव बोरगावकर , विवेक चव्हाण( गायक), बळवंत पांचाळ आळंदी (तबलासात), अरुण पगारे (हार्मोनियम ), गणेश भोयर( गायक ), ब्रह्मानंद जाधव (तबला )यांनी साथ संगत केली.

**जाहिरनामा**

## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. २३ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार मधुबाई भ्र. दत्तात्रय तळणीकर ज्यापेक्षा मुलगा नामे राजकुमार दत्तात्रय तळणीकर हे दिनांक २७/०१/२०२४ रोजी मौजे बोरोळ ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | मधुबाई भ्र. दत्तात्रय तळणीकर | ५९ | आई |
| २) | आरती भ्र. राजकुमार तळणीकर | २२ | पत्नी |
| ३) | प्रिया पि. राजकुमार तळणीकर | ०३ | मुलगी |
| ४) | दिव्या पि. राजकुमार तळणीकर | ०१ | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १६/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २६/०३/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

**जाहिरनामा**

## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. २५ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार रामचंद्र पि. निवृत्तीराव भुरे ज्यापेक्षा पत्नी नामे सुकमारी उर्फ सुकमारबाई रामचंद्र भुरे हे दिनांक १४/११/२०१९ रोजी मौजे लास-ोना ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | रामचंद्र पि. निवृत्तीराव भुरे | ७० | पत्नी |
| २) | रविंद्र पि. रामचंद्र भुरे | ३६ | मुलगा |
| ३) | राजश्री भ्र. दयानंद सिरसाठ | ३४ | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १६/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २६/०३/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

**जाहिरनामा**

## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. २४ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार नारायण पि. रामदेव जोशी ज्यापेक्षा आई नामे लक्ष्मीबाई रामदेव जोशी हे दिनांक २७/०८/२०१६ रोजी मौजे बोरोळ ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | नारायण पि. रामदेव जोशी | ६८ | मुलगा |
| २) | शिवाजी पि. रामदेव जोशी | ५४ | मुलगा |
| ३) | जयाबाई भ्र. जगन्नाथराव जोशी | ६५ | सुन |
| ४) | धोंडिराम पि. जगन्नाथराव जोशी | २८ | नातु |
| ५) | कल्पना भ्र. किशनराव कुलकर्णी | ७२ | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १६/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २६/०३/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

### टि.सी. हरवली आहे

माझी सुरेश रतन पवार या नावाची इयत्ता १० वी नापास मुळ टि. सी दि. १६/०२/२०२४ रोजी उदगीर ते लातूर बसने प्रवास हरवली आहे. जर कोणास सापडल्यास संपर्क साधवा. मो.नं. ८१८०८०६३४३








## उदगीर मनोरंजन

**कल्पना** 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो




## उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया | | |

**मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय**

**भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स**

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव


# ग्राम पंचायत कार्यालय मलकापुर ता.उदगीर जि.लातूर

दिनांकः १९ /०२/२०२४

## जाहीर प्रगटन

तमाम नागरिकांना या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, मलकापुर ग्राम पंचायत हद्दीतील खालील प्लॉट मालकांनी / घर मालकांनी आपल्या प्लॉटची/घराचे नामांतर होण्यासाठी आवश्यक पुरावा आणि दस्तऐवज दाखल केल्याने खालील प्लॉटच्या, घराच्या मालकी हक्काबाबत इतर कोणाचे हक्क संबंध हरकती असतील तर आजपासून पुढील तारखेपर्यत म्हणजेच दि. ०५.०३.२०२४ पर्यंत सबळ पुराव्यासह ग्राम पंचायत कार्यालय,मलकापुर येथे हरकती सादर कराव्यात ज्या प्लॉटच्या / घराच्या संदर्भात तक्रारी /हरकती नाही त्यांची नोंदी /फेरफार कायदेशिररित्या मुदतीनंतर केले जाईल. त्यानंतर कोणाचीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. म्हणून हे जाहीर प्रगटन देत आहोत कृपया संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | लिहून घेणार | लिहून देणार | मिळकतीचे वर्णन | चतुःसिमा | ख.ख.न |
|---|---|---|---|---|---|
| १ | शदर नारायणराव मोगले<br>वसंत नारायणराव मोगले<br>रा. लोहारा ता.उदगीर | मनेश माधव मरेवार<br>रा. उदगीर | स.न. ४६/८ ग्रा.पं.नं. ४२२४<br>प्लॉट नं.२२<br>पु.प.१९.८१ मी<br>द.उ.१४.०२ मी | पुर्वेस - ८.३८ मीटरचा रोड<br>पश्चिमेस- ३.०० मिटरचा रोड<br>दक्षिणेस - दयानंद पाटील यांचा प्लॉट<br>उत्तरेस - सुशांत अंबेसंगे यांचा प्लॉट | ३३२/<br>१७-०१-२०२४ |
| २ | कुसुम भीमाशंकर टेंकाळे<br>रा. गवळी गल्ली लातूर | सविता अनिल रेडकर<br>रा. चिल्ले कॉम्प्लेक्स जवळ<br>आनंद नगर लातूर | स.न. ४६/५ ग्रा.पं.नं. २१७८<br>प्लॉट नं.४६<br>पु.प.१५ मी<br>द.उ.९.२० मी | पुर्वेस - प्लॉट नं. ४१<br>पश्चिमेस- ६.१० मीटरचा रोड<br>दक्षिणेस - प्लॉट नं. ४७<br>उत्तरेस - प्लॉट नं. ४५ | ३५६७<br>०४/०९/२०२३ |
| ३ | प्राजक्ता राजकुमार पुंडेकर<br>रा. महादेववाडी ता.उदगीर | शांतवीर मन्मथप्पा मुळे<br>रा. उदय कॉलनी उदगीर | स.न. ४३/४ ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. २५<br>पु.प.८.२३ मी<br>द.उ. १२.१९ मी | पुर्वेस - प्लॉट नं. २४<br>पश्चिमेस- प्लॉट नं. २६<br>दक्षिणेस - सर्वे नं. ४३ ची मिळकत<br>उत्तरेस - ९ मीटरचा रोड | ७६९<br>०८/०२/२०२४ |
| ४ | रत्नमाला संदीप शेल्हाळकर<br>रा. शेल्हाळ पो. तोंडचीर<br>ता.उदगीर | अजयकुमार रमेशलाल चोपडा<br>(जैन)<br>रा. भातंब्रा ता.भालकी | स.न. ४७ ग्रा.पं.नं. २७६१<br>प्लॉट नं. ३८<br>पु.प. ११ मी<br>द.उ. १४ मी | पुर्वेस - प्लॉट नं. १६<br>पश्चिमेस- ६ मीटरचा रोड<br>दक्षिणेस - प्लॉट नं. ३७<br>उत्तरेस - ७.६२ मीटरचा रोड | ६६९<br>०२/०२/२०२४ |
| ५ | महेश भागवत कांडणगीरे<br>सिंधू महेश कांडणगीरे<br>रा. कमालवाडी ता.देवणी | शरदकुमार शिवाजी भंडे<br>राहुल शांतीकुमार होनमाळे<br>अतुल अशोक नालटे | स.न. ५९ ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. १७<br>पु.प. १३.७१ मी<br>द.उ. ७.९३ मी | पुर्वेस - ९ मीटरचा रोड<br>पश्चिमेस- प्लॉट नं. १८<br>दक्षिणेस - प्लॉट नं. १६<br>उत्तरेस - प्लॉट नं. २० | ४८७०<br>१७/११/२०२३ |
| ६ | राम शंकरप्पा वडजे<br>सरिता राम वडजे<br>रा. उदगीर | कुसुम विठ्ठल कोनाळे<br>रा. अंधोरी वेस्ट मुंबई | स.न. ४५ ग्रा.पं.नं. १७३४<br>प्लॉट नं. ०१<br>पु.प. १६.०३ मी<br>द.उ. १०.३६ मी | पुर्वेस - बिरादार व मुळे यांची मिळकत<br>पश्चिमेस- ६ मीटरचा रोड<br>दक्षिणेस-शिवनंदा बिरादार यांची मिळकत<br>उत्तरेस - ६ मिटरचा रोड | ३९५<br>१८/०१/२०२४ |
| ७ | दिगांबर दशरथ फंताडे<br>रा. सुगाव बू. ता.मुखेड | भीमराव गुणवंतराव पाटील व इतर<br>रा. मळकापुर ता.उदगीर | स.न. ३० ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. ४९<br>पु.प. ४० फुट<br>द.उ. ३० फुट | पुर्वेस - २५ फुटाचा रोड<br>पश्चिमेस- प्लॉट नं. ४२<br>दक्षिणेस- प्लॉट नं. ४८<br>उत्तरेस - लिहून देणार यांची प्लॉटींग | २४६८<br>१८/०४/२०१६ |
| ८ | फकीरमुमताजबी फरीद शेख व इतर<br>रा. मलकापुर | शेख फरीद मैयनोदीन<br>रा. मलकापुर | स.न. ४८ ग्रा.पं.नं. १७८२<br>प्लॉट नं. ६०<br>पु.प. द.उ. | पुर्वेस -<br>पश्चिमेस-<br>दक्षिणेस-<br>उत्तरेस - | civil no.<br>891/2023 |
| ९ | शितल विलास गुट्टे<br>रा. उमरदरा ता.जळकोट | शेख मो इब्राहीम मो आ. सत्तार शेख व इतर रा. उदगीर | स.न. ५/१,५/२ ग्रा.पं.नं. ४५६४<br>प्लॉट नं. ३६<br>पु.प. ४१ फुट द.उ. २८ फुट | पुर्वेस - २० फुटाचा रोड<br>पश्चिमेस- प्लॉट नं. २३<br>दक्षिणेस- प्लॉट नं. ३५<br>उत्तरेस - प्लॉट नं. ३७ | ६९२३<br>१३/११/२०१८ |
| १० | विलास सूर्यकांत गुट्टे<br>रा. उमरदरा ता.जळकोट | पंडितराव बापूराव पाटील<br>उदगीर | स.न. ४० ग्रा.पं.नं. २००४<br>प्लॉट नं. ०९<br>पु.प.द.बा. ३२ फुट<br>पु.प.यू.बा. २४ फुट द.उ. ४५ फुट | पुर्वेस - प्लॉट नं. १०<br>पश्चिमेस- २० फुटाचा रोड<br>दक्षिणेस- प्लॉट नं. ०७ व ०८<br>उत्तरेस - २० फुटाचा रोड | १६२७<br>२४/०४/२०२३ |
| ११ | शिल्पा श्रीधर आमगे<br>अश्विनी विकास देशमुख | शिवलीला प्रदीप गुळंगे<br>रा.पारकट्टी गल्ली, उदगीर | स.न. ५७/१ ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. १५<br>पु.प.३५ फुट द.उ. ३५ फुट | पुर्वेस - प्लॉट नं. १४<br>पश्चिमेस- २० फुटाचा रोड<br>दक्षिणेस- ३० फुटाचा रोड<br>उत्तरेस - प्लॉट नं. १६ | ३०२०<br>१७/०५/२०२२ |
| १२ | सुभद्राबाई शंकर भालके<br>रा. मलकापुर | शंकर माणिकराव भालके<br>अभिजीत दयानंदराव रोडगे | स.न. ४२/४ ग्रा.पं.नं. ३३३१<br>प्लॉट नं. ०१<br>पु.प.२६ फुट द.उ. २५ फुट | पुर्वेस - २० फुटाचा रोड<br>पश्चिमेस- प्लॉट नं. ०२<br>दक्षिणेस- २० फुटाचा रोड<br>उत्तरेस - समाधी | १७२<br>११/०१/२०२१ |
| १३ | शेख फरीद मैनोदीन<br>रा. येनकी ताउदगीर | ताहेराबी जावेद शेख<br>रा. बनशेळकी रोड उदगीर | स.न. ४८ ग्रा.पं.नं. १७८२<br>प्लॉट नं. ६०<br>पु.प.३० फुट द.उ. ४५ फुट | पुर्वेस - २० फुटाचा रोड<br>पश्चिमेस- प्लॉट नं. ५९<br>दक्षिणेस- प्लॉट नं. ५३<br>उत्तरेस -प्लॉट नं. ६१ | ६०८<br>०९/०२/२०१२ |
| १४ | लक्ष्मीबाई नारायण चेरेकर<br>रा.उदगीर | जम्मू नियाज मोहम्मद खान मोहम्मद व इतर | स.न. ५/१ ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. १७<br>पु.प.११.२८ मी द.उ. ७.७२ मी | पुर्वेस - प्लॉट नं. १८<br>पश्चिमेस- ६ मीटर रोड<br>दक्षिणेस- प्लॉट नं. १६<br>उत्तरेस -प्लॉट नं. २० | ३४०६<br>०५/०७/२०२१ |
| १५ | बालिका गंगाधर चेरेकर<br>रा. उदगीर | एजाज मोहम्मद खान<br>मोहम्मद जम्मू व इतर | स.न. ७/१ ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. २६<br>पु.प.द.बा. ११.४४ मी<br>पू.प.उ.बा. १०.७३ मी द.उ. ९.१४मी | पुर्वेस - खुली जमीन<br>पश्चिमेस- ६ मीटर रोड<br>दक्षिणेस- प्लॉट नं. २७<br>उत्तरेस -प्लॉट नं. २५ | ४४७<br>२७/०१/२०२१ |
| १६ | पिरपाशा मुबारक शेख<br>रा. कावठाळा ता.देवणी | शेख हमीद मोहियोद्दीनसाब<br>रा. बनशेळकी रोड, उदगीर | स.न. ४८ ग्रा.पं.नं. १६५५<br>प्लॉट नं. ४४<br>पु.प.४० फुट<br>द.उ. ३० फुट | पुर्वेस - २० फटाचा रोड<br>पश्चिमेस- बशीरद्दीन यांची जमीन<br>दक्षिणेस- प्लॉट नं. ४३<br>उत्तरेस -प्लॉट नं. ४५ | civil no.<br>1151/2023 |
| १७ | बालाजी तुळशीराम वाघमारे<br>रा. क्रांतीनगर मलकापुर | पार्वतीबाई तुळशीराम वाघमारे व इतर | स.न. ४८ ग्रा.पं.नं. ३९८<br>प्लॉट नं. ८३<br>पु.प.४० फुट<br>द.उ. ३५ फुट | पुर्वेस - २० फटाचा रोड<br>पश्चिमेस- प्लॉट नं. ८४<br>दक्षिणेस- खुला प्लॉट<br>उत्तरेस -खुला प्लॉट | civil no.<br>1356/2023 |
| १८ | रुकसाना बेगम चांदसाब शेख व इतर<br>रा. मलकापुर | चांदसाब इसमोद्दीन शेख | स.न. ५४/२ ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. ३७<br>पु.प. ३० फुट<br>द.उ. ४५ फुट | पुर्वेस - २० फटाचा रोड<br>पश्चिमेस- प्लॉट नं. ५९<br>दक्षिणेस- प्लॉट नं. ५३<br>उत्तरेस -प्लॉट नं. ६१ | ६०८<br>०९/०२/२०१२ |
| १९ | दिगंबर श्रीपतीराव बिरादार<br>रा. हैबतपुर ता.उदगीर | भरत बाबुराव यलमटे<br>ज्ञानोबा मारोती खंदाडे<br>रा. हणमंतवाडी ता.उदगरी | स.न. ५४/२ ग्रा.पं.नं. १९३९/९<br>प्लॉट नं. ३७<br>पु.प.द.बा.४१फुट, द.उ.पु.बा.३७ फुट<br>पू.प.उ.बा.३९फुट, द.उ.प.बा. ३० फुट | पुर्वेस - २० फटाचा रोड<br>पश्चिमेस- कोटलवार यांची जमीन<br>दक्षिणेस- प्लॉट नं. ३८<br>उत्तरेस -प्लॉट नं. ३६ | २५/०३/२०१९<br>२०१९ |
| | --------"-------- | ------"----- | स.न. ५४/२ ग्रा.पं.नं. १९३९<br>प्लॉट नं. ३६<br>पु.प.द.बा.३९ फुट<br>पू.प.उ.बा.३८फुट, द.उ.प.बा. ३४ फुट | पुर्वेस - २० फटाचा रोड<br>पश्चिमेस- प्लॉट नं. १५<br>दक्षिणेस- प्लॉट नं. ३८<br>उत्तरेस -प्लॉट नं. ३६ | २५/०३/२०१९<br>२०१९ |

नोटः- १) ग्राम पंचायतची मासिक सभा झाल्यानंतरच नमुना नं.८ची नक्कल मिळेल.
२) नजर चुकीने न्यायप्रविष्ठ प्रकरण व डबल रजिस्ट्री नोंद झाल्यास रद्द करण्याचे अधिकार ग्राम पंचायतला असतील.

ग्रामसेवक — उपसरपंच — सरपंच

**ग्राम पंचायत कार्यालय मलकापुर ता. उदगीर जि.लातूर**

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, धाराशीव कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे :९८०२२८२४० अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही) संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

**सुर्यामाई फंक्शन हॉल**
**सर्व सोयींनी युक्त**
**बुकिंग चालू आहे**
आयटीआय कॉलेज समोर, देगलूर रोड, उदगीर जि.लातूर
संपर्क - ९७६५८४३००८
पॅकेज : रु ४००००/-



**यशवंत**
मंगळवार दिनांक २० फेब्रुवारी २०२४
**उदगीर**
कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग

## किसान फॅशन मॉलचा भव्य शुभारंभ

# किसान फॅशन मॉल उदगीरच्या वैभवात भर -ना. संजय बनसोडे







**उदगीर (माधव होनराव)** उदगीर शहरात उभारण्यात आलेले किसान फॅशन मॉल हे उदगीरच्या वैभवात भर घालणारा आहे असे उद्गार राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

उदगीर येथील छत्रपती शाहु महाराज चौक येथे मल्लिकार्जुन मानकरी यांच्या भव्यदिव्य वास्तुत सोमवार दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधुन किसान फॅशन मॉलचा भव्य शुभारंभ राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे व मराठी सिनेअभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या उपस्थितीत फित कापुन व दिपप्रज्वलनाने संपन्न झाले. या कार्यक्रमास किसान फॅशन मॉलचे अध्यक्ष आ. धनपाल सुर्यनारायण (निझामबाद तेलंगणा), माजी आ. गोविंद केंद्रे, छत्रपती शाहु महाराज सैनिक विद्यालयाचे अध्यक्ष बस्वराज पाटील नागराळकर, महाराष्ट्र एज्युकेशनसोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, रमेश अंबरखाने, उद्योगपती सुर्यकांत मुक्कावार, बाजार समितीचे माजी सभापती सिध्देश्वर पाटील, विजयकुमार मानकरी, रणजीतकुमार मानकरी, डॉ. संगमेश मिठारे, भिमराव पाटील डीग्गीकर, संतोष तोडकर, रंगनाथ औटे, उदय धनपाल, नवीन साहेब उपाला, सौ. अंजली विजय धनपाल, सौ. मनीमाला सुर्यनारायण धनपाल इत्यादी उपस्थित होते.

प्रारंभी किसान फॅशन मॉल परिवाराच्या वतीने ना. संजय बनसोडे व सिनेअभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांचे स्वागत करण्यात आले. ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते फित कापुन दिपप्रज्वलन करुन व केक कापुन किसान फॅशन मॉलचे उद्घाटन केले.



प्रारंभी किसान फॅशन मॉलचे अध्यक्ष निजामबाद (तेलंगणा) येथील भाजपाचे आ. धनपाल सुर्यनारायण यांनी उदगीर येथे किसान फॅशन मॉल सुरु करण्या मागील भुमिका सांगुन धनपाल परिवाराला १९५२ पासुन कापड व्यवसायाचा अनुभव असुन आई वडीलांच्या नावाने ट्रस्ट निर्माण करुन सामाजिक सेवा केली जाते. उदगीर येथील सुरु झालेला १० मॉल असुन गुणवत्ता, सेवा व किफायशीर भाव यात त्रिसुत्राच्या आधारेच या व्यवसायात यश संपादन केले असुन ग्राहक हाच केंद्रबिंदु मानुन ही वाटचाल सुरु ठेवली आहे. किसान फॅशन मॉल निश्चितच उदगीरकरांच्या पसंतीस उतरेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

बस्वराज पाटील नागराळकर यांनी शुभेच्छा देताना म्हणाले की, तीन राज्याच्या सिमेवर असलेल्या उदगीर शहरात उभारलेले किसान फॅशन मॉलची निश्चित भरभराट होणार असल्याचे सांगुन उदगीरच्या आर्थिक विकासात किसान मॉलचे योगदान मोलाचे ठरणार आहे असे सांगुन शुभेच्छा दिल्या. माजी आ. गोविंद केंद्रे म्हणाले की, उदगीरकरांना आधुनिक दर्जेदार दालन आ. धनपाल सुर्यनारायण यांनी उपलब्ध करुन दिले. याचा उदगीर व परिसरातील सर्वस्तरातील नागरीकांना परवडेल आशाच व उत्तर दर्जाचे दालन सुरु केल्याबद्दल अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.मराठी सिनेअभिनेत्री प्रार्थना बेहेरे किसान फॅशन मॉलला शुभारंभास शुभेच्छा देवून म्हणाल्या की, आत्याधुनिक व भव्य दिव्य किसान फॅशन मॉल उदगीरकरांच्या सेवेत दाखल झाला आहे. निश्चितच पुण्या मुंबई ठिकाणसारख्या दर्जेदार फॅशन मॉल असला तरी या ठिकाणचे भाव हे मात्र मुंबई सारखे नव्हे तर उदगीरकरांना परवडेल अशाच स्वरुपाचे असल्याचे सांगुन या किसान फॅशन मॉलचा लाभ सर्व स्तरातील जनतेने घ्यावा असे कार्यक्रमाचे आवाहन सौ. अंजली विजय धनपाल यांनी मानले.

सौ. श्यामला सुर्यकांत मुक्कावार, किशोर मुक्कावार, मोहन मुक्कावार, प्रसाद मुक्कावार, आरोहि मोहन मुक्कावार, श्रध्दा मुक्कावार, प्राही प्रसाद मुक्कावार यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### ग्राहकांची अलोट गर्दी.....

किसान फॅशन मॉलच्या शुभारंभाच्या पहिल्याच दिवशी उद्घाटन समारंभ संपन्न होताच उदगीर शहर सिमा भागातील महिला, पुरुष यांनी खरेदीसाठी एकच मोठी गर्दी केली होती. शुभारंभा दिवशी किसान फॅशन मॉलने खरेदीवर मोठया प्रमाणात ऑफरची जाहिरात माध्यमातून प्रकाशित केल्याने प्रत्येकजण हा खरेदीचा मुहूर्त साधण्यासाठी गर्दी केल्याचे दिसुन आले.

# छत्रपती शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवुन आपण जीवनात वाटचाल करावी : क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे





**उदगीर (प्रतिनिधी)** छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार आजच्या तरुण पिढीने डोळ्यासमोर ठेवुन जीवनात मार्गक्रमण केले तर आपण एक आदर्श व्यक्ती म्हणून नक्कीच समाजासमोर उभे राहून यश संपादन करु शकतो म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवुन आपण वाटचाल करावी असे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहर व तालुक्यातील विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजीत कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.

यावेळी माजी आ.गोविंद केंद्रे, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप भागवत, तहसीलदार राम बोरगावकर, मुख्याधिकारी सुंदर बोंदर, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी सभापती सिध्देश्वर मुन्ना पाटील, सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष पृथ्वीराज एकंबेकर, सुधीर भोसले, मनोज पुदाले, सावन पस्तापुरे, श्याम डावळे, उमाकांत तपशाळे, उदय मुंडकर, अजित पाटील, सुदर्शन मुंडे, पो.नि. करण सोनकवडे, डॉ. दत्ता पाटील, अमोल निडवदे, समीर शेख, जानीमियाँ सय्यद, समद शेख, कुणाल बागबंदे, दत्ता पाटील, शहाजी पाटील तळेगावकर, मदन पाटील, बिपीन पाटील, चंद्रकांत टेंगटोल, अंकुश ताटपल्ले, बबिता भोसले, उषाकिरण बिरादार, प्रतिभा मुळे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त उदगीर शहरात सकाळी ८ वाजता महाराजांना अभिवादन केले. यावेळी शिवजन्मोत्सवानिमित्त बाळ शिवबाच्या पाळण्याचा कार्यक्रम झाला त्यानंतर भव्य अशा शिवकालीन देखाव्याची मिरवणुक व मोटारसायकल रॅली काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त मतदार संघातील कोदळी, घोणसी व जळकोट येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, उदगीर शहरात मराठा भवन उभारणीसाठी १० कोटी रुपयाचा निधी, छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवनासाठी २१ कोटी तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने महाप्रवेशाव्दारासाठी दिड कोटी, मराठा मुलांच्या वसतीगृहासाठी १४७ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन दिला. मराठा समाजाच्या स्मशानभुमीचा प्रश्न सोडवला. मतदार संघाचा विकास करताना सर्वजाती धर्माला सोबत घेवुन न्याय दिला. आता मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी विशेष अधिवेशन घेवुन आरक्षण देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे ना.संजय बनसोडे यांनी सांगितले. यावेळी नागरीक व तरुण समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तरुणाईला साद घालत ना.संजय बनसोडे यांचा मोटारसायकलवरुन शहरात फेरफटका....

उदगीर शहरात तरूणांनी आयोजीत केलेल्या मोटारसायकल रॅलीला साथ देत क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी मोटारसायकल रॅलीत प्रत्यक्ष सहभागी होवुन तरूणांचा उत्साह वाढवुन छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नांदेड नाक्यापर्यंत मोटारसायकलवर हातात भगवा झेंडा घेवुन महाराजांचा जयघोष करत शहरात फ्फेरफ्फटका मारला. यावेळी हजारो तरुण उपस्थित होते.